**प्रेसनोट दि.२१/०५/२०१९**

**बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर**

**अंमली पदार्थ विक्रीसाठी घेवुन आलेल्या इसमास अटक .**

दि.२०.०५.२०१९ रोजी पोलीस हवालदार चिप्पा यांना त्यांचे खास बातमीदारामर्फत बातमी मिळाली की, अप्पर बस स्टॉप बिबवेवाडी पुणे येथे एक साधारण २५ वर्ष वयाचा इसम त्याचे अंगामध्ये काळया रंगाचा टि-शर्ट,जिन्स पँट घातलेला, त्याचे डोक्याचे वरील केस बांधलेला असा इसम गांजा हा अमली पदार्थ अप्पर बस स्टॉप येथे विक्रीसाठी घेवुन येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी बातमीदारामर्फत मिळाली असता सदर बातमीचा सारांश वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांना सांगुन त्यांनी मा.पोलीस उप अयुक्त सो.परिमंडळ-०५ यांना कळवुन त्यांचे आदेशान्वये स्वतः वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांनी सदर भागात पोलीस ठाणे कडील स्टाफसह सापळा रचला असता सदर ठिकाणी बातमीचे अनुषंगाने एक इसम दिसुन आल्याने त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव भिम राजु कांबळे वय २६ वर्षे रा.विकास इंडे यांचे खोलीत भाडयाने, खडके वस्ती महावीर गार्डनसमोर डॉल्फीन चौक अप्पर बिबवेवाडी पुणे असे सांगीतले असुन त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात किंमत रुपये ६२,४४०/- चा ०३ किलो १२२ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व रोख रक्कम अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्यास स्टाफच्या मदतीने पोलीस ठाणेस आणुन त्याचे विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(त्त)(ब) प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात आलेली असुन पुढील तपास सपोनि श्री किरण पावसे करीत आहेत.

सदरची कामगीरी श्री प्रकाश गायकवाड,पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-०५ पुणे शहर.यांचे मार्गदर्शना प्रमाणे व श्री मिलींद पाटील,सहा.पोलीस आयुक्त सो,वानवडी विभाग पुणे शहर यांचे सुचने प्रमाणे श्री मुरलीधर करपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर. सपोनि. श्री किरण पावसे, पो.हवा.चिप्पा, दबडे, पोलीस शिपाई शिंदे, कुलकर्णी, राख यांनी केली आहे.